विद्याविकास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/३६४ दिनांक : १९/११/२०२५

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेत सहभागी होणेबाबत...**
**संदर्भ क्र : सांकासं/४८२० दिनांक १०.११.२०२५ चे पत्र**

महोदय/महोदया,

सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेचे या वर्षापासून आयोजन करण्यात येणार आहे. उपरोक्त संदर्भान्वये एकांकिका स्पर्धा आयोजित करण्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित झालेला आहे. महाविद्यालयीन स्तरावर नाट्य कला व संस्कृतीची आवड निर्माण व्हावी, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एकांकिका स्पर्धेत भाग घ्यावा व सादरीकरणासोबच विद्यार्थ्यांमध्ये कलागुण वाढावे, हा यामागील मूळ हेतू आहे.

मा. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा आयोजित केली असून या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबतचे निर्देश प्राप्त झाले आहेत. या स्पर्धा जिल्हा, विभाग आणि राज्य या तीन टप्प्यांत होणार आहे. प्रवेशिका १ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत https://mahanatyaspardha.com या वेबलिंकवर भरता येतील. प्राथमिक व अंतिम फेरीतील संघांना नाटयनिर्मिती खर्च रूपये १०,००० तसेच प्रवासखर्च देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट एकांकिका व विविध तांत्रिक/कलात्मक विभागांसाठी रोख पारितोषिके आणि रौप्यपदके प्रदान केली जाणार आहेत. या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

मा. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांनी महाराष्ट्र राज्य एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन

## सांस्कृतिक कार्य संचालनालय

जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट: www.mahasanskruti.org ई-मेल : mahaculture@gmail.com दूरध्वनी क्र ०२२: २२८४२६७०/३४ , २२०४३५५०/७१

---

क्र. सांकासं/४८२० दिनांक: १०.११.२०२५

प्रति,

मा. कुलगुरु,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
जि. पुणे

विषय :- महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेत महाविद्यालयांनी सहभाग घेण्याबाबत
संदर्भ :- एकांकिका स्पर्धा आयोजित करण्याबाबत निर्गमित झालेला शासन निर्णय

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेचे या वर्षापासून आयोजन करण्यात येणार आहे. उपरोक्त संदर्भान्वये एकांकिका स्पर्धा आयोजित करण्याबाबचा शासन निर्णयही निर्गमित झालेला आहे. महाविद्यालयीन स्तरावर नाट्य, कला व संस्कृतीची आवड निर्माण व्हावी, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एकांकिाका स्पर्धेत भाग घ्यावा व सादरीकरणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये कलागूण वाढावे, हा यामागील मूळ हेतू आहे.

ही स्पर्धा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खुली असून यामध्ये जिल्हास्तरावर तालीम फेरी, विभाग स्तरावर प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी राज्यस्तरावर होणार आहे.

राज्य एकांकिका स्पर्धेतील विजेत्या संघांना वेगवेगळ्या पातळीवर भरघोस पारितोषिके जाहीर करण्यात आलेली आहेत.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या विद्यापीठांतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयांना या राज्य एकांकिका स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. या राज्य

एकांकिका स्पर्धेसाठी ऑनलाईन प्रवेशिका https://mahanatyaspardha.com या वेबसाईटवर सादर करण्याची सुरुवात दिनांक १ ऑक्टोबर पासून सुरु झालेली असून दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत प्रवेशिका सादर करता येणार आहे.

आपणास पुन्हा एकदा विनंती आहे की, सर्व महाविद्यालयांना एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावरून अवगत करावे व जास्तीत जास्त संघानी यामध्ये भाग घ्यावा यासाठी प्रवृत्त करावे, ही विनंती.

या राज्य एकांकिका स्पर्धेसाठी महाराष्ट्र शासनाकडून प्राथमिक व अंतिम फेरीच्या संघांना नाट्यनिर्मिती खर्च रु.१०,०००/- इतके अनुदान तसेच जाण्या-येण्याचा प्रवासखर्च सुद्धा देण्यात येणार आहे. तसेच प्रथम, द्वितीय, तृतीय एकांकिकांना रोख पारितोषिके तसेच दिग्दर्शन, लेखन, प्रकाश, नेपथ्य, रंगभूषा, वेषभूषा, संगीत आणि अभिनयासाठी रौप्यपदक इ. वैयक्तिक व सामूहिक पारितोषिकही देण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या सृजनात्मक, कलात्मक व सर्वांगीण विकासासाठी ही एकांकिका स्पर्धा अतिशय महत्त्वाची असल्यामुळे आपण विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(बिभीषण चवरे)
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र राज्य

सोबत :- शासन निर्णय

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी "महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा" आयोजनाच्या नियमावलीस मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र.३१६ (ई.नं.११०९४७८)/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ सप्टेंबर, २०२५

<u>वाचा</u> :- सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./२४३९ दिनांक २३ एप्रिल, २०२५.

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र राज्याची नाट्यपरंपरा अत्यंत समृद्ध आहे. एकांकिका हा नाटकाचा उपप्रकार असून या प्रयोगाच्या माध्यमातून अनेक कलाकार व तंत्रज्ञ आपली कला सादर करीत असतात. मराठी एकांकिका क्षेत्राने अनेक प्रतिभावान लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार घडवले आहेत. व्यावसायिक रंगभूमी पासून ते महाविद्यालयातील विद्यार्थीही एकांकिका स्पर्धांमधून आपली कला सादर करीत असतात. एकांकिकांमधून कौटुंबिक, सामाजिक प्रश्नही अभिव्यक्त केले जातात. त्यामुळे कलावंतांच्या वैचारिकतेला वाव मिळतो.

तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे तरुण पिढीमध्ये नाट्यकलाविषयी आकर्षण कमी होत आहे. त्यामुळे या क्षेत्रात नवोदित प्रतिभांना प्रोत्साहन देणे, मराठी भाषेचा प्रसार करणे आणि नाट्यकलेचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. याचधर्तीवर, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एकांकिका स्पर्धांद्वारे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनामार्फत दरवर्षी "महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा योजना" आयोजित करण्याच्या नियमावलीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

तरुण पिढीतील कलाकारांना एकांकिका स्पर्धांद्वारे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनामार्फत दरवर्षी "महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा" आयोजित करण्यास तसेच सदर स्पर्धेचे आयोजन करण्यासाठीची कार्यपध्दती सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टांमधील नमूद कार्यपध्दती, नियम व अटी, प्रवेशिका, पारितोषिक यासह या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर स्पर्धेच्या आयोजन व पारितोषिक प्रयोजनार्थ करण्यात येणारा खर्च "मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०२) राज्य नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०१) राज्य मराठी, हिंदी, संगीत, बाल, संस्कृत व दिव्यांग नाटय स्पर्धा (कार्यक्रम) (२२०५ १४९२) ५० इतर खर्च व ०५ बक्षिस" अनुक्रमे या लेखाशिर्षाखाली नमूद उद्दिष्टांमधून त्या-त्या वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

०३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०९२९१६४४३२८१२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BALASAHEB
ISHWAR SAWANT

Digitally signed by BALASAHEB ISHWAR SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT,
2.5.4.20=[illegible],
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=[illegible], cn=BALASAHEB ISHWAR SAWANT
Date: 2025.09.29 16:45:56 +05'30'

**( बाळासाहेब ईश्वर सावंत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई ४०० ०३२.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. निवड नस्ती, सां.का.४

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र. ३१६/सां.का.४, दि. २९ सप्टेंबर, २०२५ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट- अ

महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा तीन फेऱ्यांमध्ये घेण्यात येईल-

(I) पहिली फेरी- तालीम फेरी (३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी)

(II) दुसरी फेरी-प्राथमिक फेरी (०६ महसूली विभाग)

(III) तिसरी फेरी-अंतिम फेरी (राज्यस्तरीय)

सदर स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना खालील नियम व अटी लागू राहतील :-

**(I) तालीम फेरी कार्यपध्दती-**

१. राज्याच्या ३६ जिल्ह्यांमध्ये तालीम फेरी घेण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेच्या प्रत्येक केंद्रांवर तीन परीक्षकांचे स्वतंत्र ३६ गट तालीम फेरीमध्ये तालीम स्वरुपात नाट्यकृतींचे सादरीकरण पाहतील.

३. तालीम स्वरुपातील एकांकिका म्हणजे रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत, ध्वनीक्षेपण व्यवस्था, प्रकाश योजना याशिवाय सादर केलेली नाट्यकृती असे समजण्यात येईल. मुख्यत्वे एकांकिकेचा आशय, कलाकारांचा आवाजाचा वापर,हालचाली, अभिनय याला महत्त्व देऊन एकांकिकांचे मूल्यांकन केले जाईल.

४. एका केंद्रावर अंदाजे कमीतकमी ४० एकांकिकांचे तालिम स्वरुपात सादरीकरण करण्यात येईल.

५. एका केंद्रावर एका दिवसात किमान पाच एकांकिकांचे परीक्षण परीक्षकांद्वारे करण्यात येईल.

६. मराठी एकांकिका स्पर्धेच्या तालीम फेरीतून प्राथमिक फेरीसाठी प्रत्येक केंद्रावरील १० : १ याप्रमाणे म्हणजेच तालीम फेरीच्या प्रत्येक केंद्रावर १० एकांकिका सादर झाल्यास १ एकांकिका प्राथमिक फेरीसाठी निवडण्यात येईल. याचप्रमाणे पुढे २० : २, ३० :३, ४० : ४, ५० : ५, ६० : ६, ७० : ७, ८० : ८, ९० : ९, १०० : १० या प्रमाणात एकांकिकांची निवड प्राथमिक फेरीसाठी करण्यात येईल.

७. ज्या केंद्रावर १० पेक्षा कमी प्रवेशिका प्राप्त होतील. त्या केंद्रावर तालीम फेरी होणार नाही. १० पेक्षा कमी असणाऱ्या प्रवेशिका संबंधित जिल्ह्याच्या शेजारी असणाऱ्या केंद्रावर जोडण्यात येईल. याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना असतील.

८. तालीम फेरीची एकांकिका एखाद्या लहान सभागृहात (नाट्यगृह नव्हे) सादर करण्यात येतील.

९. तालीम फेरीत विहीत वेळ मर्यादेत कलाकारांना नाट्यकृती सादर करावी लागेल.

१०. महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेत जुनी किंवा नवीन संहितेचे नाटक सादर करता येईल, परंतु नवीन संहिता असल्यास ५ गुण अधिक देण्यात येतील.

**(II) प्राथमिक फेरी कार्यपध्दती-**

१. राज्यातील सहा महसुली विभागाच्या ६ केंद्रांवर आयोजित करण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेत तालीम फेरीतून एकूण ३६ केंद्रावरुन प्राथमिक फेरीस पात्र ठरलेल्या नाटकांची प्राथमिक फेरी घेण्यात येईल. प्राथमिक फेरीसाठी किमान ५ प्रवेशिका संबंधित केंद्रावर येणे बंधनकारक राहिल. प्राथमिक फेरीत पाचपेक्षा कमी संघ पात्र ठरल्यास शेजारील केंद्राशी हे संघ जोडण्यात येतील.

३. प्रत्येक प्राथमिक फेरी आयोजन केंद्रावर ३ परीक्षक असतील.

४. महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी प्रत्येक केंद्रातून जास्तीत जास्त ५ एकांकिकेची निवड करण्यात येईल.
५. महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतून प्रत्येक केंद्रातून निवडण्यात आलेल्या ५ एकांकिकांना प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, पंचम असे क्रमांक देण्यात येईल.
६. महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी निवड केलेल्या नाटकांना व प्राथमिक फेरीत पूर्ण नाटयप्रयोग सादर करणाऱ्या महाविद्यालयांना रुपये १०,०००/- नाट्यनिर्मिती खर्च म्हणून देण्यात येईल.

(III) अंतिम फेरी कार्यपध्दती -

१. राज्य मराठी एकांकिका स्पर्धेच्या प्रत्येक प्राथमिक केंद्रावरुन अंतिम फेरीत सादर होणारी प्रत्येकी ५ म्हणजे एकूण ३० नाटकांची अंतिम फेरी होईल.
२. अंतिम फेरीसाठी तीन परीक्षकांची निवड संचालनालयामार्फत करण्यात येईल. अंतिम फेरीतील परीक्षक कमाल ३ सर्वोत्कृष्ट एकांकिकेची प्रथम / द्वितीय / तृतीय या क्रमांकाची निवड करतील.

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र. ३१६/सां.का.४, दि.२९ सप्टेंबर, २०२५ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट- ब

### एकांकिका परीक्षक निवड पात्रता-

१. परीक्षकाचे वय किमान ३५ वर्ष असावे.

२. परीक्षकाला किमान १० नाटकांचा अनुभव असणे आवश्यक आहे. यामध्ये लेखन / दिग्दर्शन /ध्वनी / प्रकाश / नेपथ्य / अभिनय इ. नाट्यक्षेत्राशी निगडीत बाबींचा समावेश असेल.

३. ज्या परीक्षकांनी सलग तीन वर्ष नाटक / एकांकिका स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून काम केले आहे, अशा परीक्षकांची नेमणूक पुढील किमान दोन वर्ष प्रतिबंधित असेल.

४. सदर परीक्षकांची नेमणूक त्यांच्या मूळ जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यात देण्यात येईल.

५. नाट्यविषयक अभ्यासक / संशोधक यांनाही परिक्षक म्हणून घेण्यात येईल.

६. प्रत्येक केंद्रावर किमान एक महिला परिक्षक नियुक्त करण्यात येईल.

७. ज्यांनी यापूर्वी नाटक / एकांकिका स्पर्धेत परिक्षक म्हणून काम केलेले असेल, असे एक अनुभवी परिक्षक प्रत्येक केंद्रावर नियुक्त करण्यात येईल.

८. प्रती दोन केंद्रामागे एक परीक्षक राखीव ठेवण्यात येईल.

९. एकांकिका स्पर्धेतील नाटकांचे परीक्षण करण्यासाठी परीक्षकांना प्रती एकांकिका रुपये ५००/- इतके मानधन अदा करण्यात येईल.

## परिशिष्ट- क

## महाराष्ट्र राज्य एकांकिका स्पर्धेत सहभाग घेण्यासाठीच्या पात्रता अटी

१. महाराष्ट्रातील महाविद्यालयांना मराठी एकांकिका स्पर्धेत सहभागी होता येईल .
२. या स्पर्धेत फक्त महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. महाविद्यालयाचे विद्यार्थी असल्याचा पुरावा सोबत जोडणे बंधनकारक आहे. महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.
३. एका महाविद्यालयाला एका पेक्षा जास्त एकांकिकेसाठी प्रवेशिका सादर करता येईल .
४. ज्या महाविद्यालयाने प्रवेशिका सादर केली आहे, त्याच महाविद्यालयातील विद्यार्थी एकांकिकेत असणे आवश्यक आहे.
५. संबंधित महाविद्यालयातील प्राध्यापक अथवा महाविद्यालय कार्यालयातील व्यक्तींना या स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही .
६. महाराष्ट्र राज्य एकांकिका स्पर्धेसाठी सुचविण्यात आलेल्या एकांकिकांत काम करणारे सर्व कलाकार हे संबंधित महाविद्यालयाचे विद्यार्थी असले पाहिजेत.
७. एकांकिका स्पर्धा भरविण्यास कमीतकमी ४० स्वीकारपात्र प्रवेशिका आल्या पाहिजेत.
८. वेळापत्रकानुसार नमूद केलेल्या दिवशी दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळी एकांकिका सादर करावी लागेल. कोणत्याही कारणास्तव महाविद्यालयाने प्रयोग न केल्यास, ते महाविद्यालय व महाविद्यालयातील एकांकिकेत भाग घेणारे विद्यार्थी पुढील वर्षीच्या एकांकिका स्पर्धेत भाग घेण्यास अपात्र असतील.

## प्रवेशिका - अटी

१. सदर स्पर्धेच्या प्रवेशिका ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात याव्यात.
२. एकांकिका स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाविद्यालयाने स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या एकांकिकेच्या संहितेची एक सुवाच्य प्रत प्रवेशिकेसोबत देणे आवश्यक असेल .
३. प्रवशिकेसोबत रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र पाठवावे लागेल. असे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय प्रत्यक्ष एकांकिका स्पर्धेत प्राथमिक फेरीत प्रयोग सादर करता येणार नाही.
४. प्रवेशिकेबरोबर जोडलेल्या कागदपत्रांत महाविद्यालयाला आपल्या एकांकिकेत काम करणाऱ्या सर्व कलाकारांची आणि तंत्रज्ञांच्या भूमिकांसहित व भ्रमणध्वनी क्रमांकासह यादी द्यावी लागेल. त्यात सुधारणा असल्यास सुधारित यादी प्रयोग सादरीकरणाच्या सात दिवस अगोदर द्यावी लागेल.
५. महाविद्यालय सादर करु इच्छिणाऱ्या एकांकिकेचे स्वरुप विशेषत: ती एकांकिका स्वतंत्र आहे किंवा भाषांतरित आहे किंवा दुसऱ्या एकांकिकेचे रुपांतर आहे, याचा उल्लेख करुन कळवावे लागेल. स्पर्धेत सादर होणारी एकांकिका ही नाटक, कथा, कादंबरी इत्यादी किंवा अन्य वाङ्मय प्रकारांवर आधारित असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल.
६. एकांकिकेची संहिता नवीन असल्यास म्हणजेच त्या संहितेचा प्रयोग त्या नावाने अथवा अन्य नावाने यापूर्वी कधीही कोणत्याही रंगभूमीवर झालेला नसल्यास तसा स्पष्ट उल्लेख प्रवेशिकेत करावा लागेल. म्हणजेच ती संहिता नवीन एकांकिका संहिता म्हणून एकांकिका लेखन पुरस्कारासाठी पात्र ठरवली जाईल.

७. महाविद्यालयाकडून अनामत रक्कम म्हणून रुपये २,०००/- इतकी रक्कम ऑनलाईन स्वरुपात प्रवेशिकेसोबत घेण्यात येईल. तसेच, जी महाविद्यालये तालीम फेरीत अपात्र होतील किंवा जी महाविद्यालये तालीम फेरीसह प्राथमिक फेरीत एकांकिकेचा पूर्ण प्रयोग सादर करतील त्यांची अनामत रक्कम परत करण्यात येईल.

८. एकांकिका स्पर्धेचे प्रयोग सादरीकरणाचे वेळापत्रक जाहीर केल्यानंतर कोणत्याही महाविद्यालयाला प्रयोग रद्द करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थिती व सबळ कारणाशिवाय ऐनवेळी प्रयोग रद्द करणाऱ्या महाविद्यालयांच्या अनामत रकमा देण्यात येणार नाहीत, त्या शासन जमा करण्यात येतील. अशा महाविद्यालयांना पुढील वर्षीच्या एकांकिका स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

९. तालीम फेरीसाठी महाविद्यालयांना कोणताही निर्मितीखर्च अथवा प्रवासखर्च देण्यात येणार नाही. तालीम फेरीनंतर होणाऱ्या प्राथमिक फेरीत पूर्ण नाटयप्रयोग सादर करणाऱ्या महाविद्यालयांना नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना, साहित्यांची वाहतूक, हमाली, नाटकाचे नेपथ्य (सेट्स) इत्यादीसाठी नाटयनिर्मिती खर्च म्हणून रुपये १०,०००/- इतकी रक्कम देण्यात येईल.

१०. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत एकांकिका सादरीकरणासाठी ध्वनी व्यवस्था, ८ स्पॉट लाईट, ४ लेव्हल्स इ. विनामुल्य पुरविण्यात येईल. याव्यतिरिक्त साहित्य आवश्यक असल्यास संबंधीत महाविद्यालयांना त्यांना त्यांची व्यवस्था करावी लागेल.

११. एकांकिका स्पर्धेदरम्यान प्रयोगाच्यावेळी महाविद्यालयातील सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांच्या ओळखपत्राची मागणी केल्यानंतर संघप्रमुखास सर्व विद्यार्थ्यांचे ओळखपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१२. कोणत्याही महाविद्यालयाला स्पर्धेतील कोणत्याही नाटकांच्या सादरीकरणसंदर्भातील तांत्रिक त्रुटी संचालनालयाला शेवटची एकांकिका संपेपर्यंत लेखी स्वरुपात निदर्शनास आणून देता येईल. निकाल जाहीर झाल्यानंतर कोणतीही तक्रार दखलपात्र नसेल.

## <u>एकांकिकेचे स्वरुप, कालमर्यादा</u>

१. महाविद्यालयाने योजिलेली एकांकिका यापूर्वी सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या एकांकिका स्पर्धेत सादर केलेले असल्यास व ती पारितोषिक प्राप्त ठरलेली असल्यास, तीच एकांकिका त्याच महाविद्यालयाला (नव्या संचात) पुन्हा सादर करता येणार नाही. तसेच यापूर्वी एकांकिका स्पर्धेत नाट्यकृती सादर करणारे महाविद्यालयातील कलाकार/तंत्रज्ञ अन्य महाविद्यालयामार्फत तीच नाट्यकृती एकांकिका स्पर्धेत सादर करु शकणार नाहीत. सदरील तरतूद एकांकिका स्पर्धेच्या दुसऱ्या वर्षापासून अमंलात येईल.

२. प्रत्येक महाविद्यालयाला एकांकिका सादरीकरण, नेपथ्य लावणे-काढणे, प्रकाश योजना, संगीत इ. साठी एक तास इतका वेळ देण्यात येईल. एकांकिका स्पर्धेत सादर केल्या जाणाऱ्या एकांकिकेची कालमर्यादा सलग कमीत कमी ३० मिनिटे तसेच जास्तीत जास्त ४५ मिनीटे असावी. तसेच नेपथ्य, प्रकाश, ध्वनी इ. व्यवस्था रंगमंचावर करण्यासाठी प्रत्येक संघाला जास्तीत जास्त १५ मिनिटे इतका वेळ देण्यात येईल. या नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधित महाविद्यालय स्पर्धेतून अपात्र होईल.

३. एकांकिका स्पर्धेत सादर करावयाच्या एकांकिकेचे त्या महाविद्यालयाने एकांकिका अथवा दीर्घांक स्वरुपात स्पर्धेपूर्वी दहापेक्षा अधिक प्रयोग अन्यत्र केले असल्यास, ती एकांकिका स्पर्धेसाठी स्विकारली जाणार नाही.

४. सादर करावयाच्या एकांकिकेत कमीत कमी दोन पात्रे असावी.

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा प्रवास व इतर खर्च

१. तालीम फेरीत सादर होणाऱ्या प्रयोगासाठी कोणताही प्रवासखर्च अथवा नाट्यनिर्मिती खर्च दिला जाणार नाही.

२. प्राथमिक व अंतिम फेरीतील सादरीकरणासाठी निवडण्यात आलेल्या महाविद्यालयांना त्या महाविद्यालयाच्या नोंदणीकृत ठिकाणाहून दुसऱ्या गावी एकांकिका सादर करण्यास सांगितले गेल्यास, त्यांना होणारा जाण्या-येण्याचा प्रवासखर्च व जेवणा-राहण्याचा दैनिक भत्ता प्रती व्यक्ती रुपये १५०/- इतका खर्च देण्यात येईल. रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचा व रेल्वे सेवा नसल्यास एस.टी. च्या सर्वसाधारण दराप्रमाणे प्रवासखर्च देण्यात येईल.

३. खर्चाची प्रतिपूर्ती एकांकिकेत भाग घेणाऱ्या व प्रवेशिकेत दिल्याप्रमाणे त्यातील भूमिका करणाऱ्या कलावंतांच्या संख्येपुरतीच म्हणजेच १५ कलाकार व १० तंत्रज्ञ प्रमाणे मर्यादित असेल.

४. एकांकिका स्पर्धेत विजेत्या संस्थांना स्पर्धेनंतर सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या निमंत्रणावरुन एक किंवा अधिक प्रयोग सादर करावे लागतील. त्याकरीता त्यांना सादरीकरणाचे मानधन, प्रवासखर्च व दैनिक भत्ता देण्यात येईल.

५. महाविद्यालयातील **कोणत्याही कलावंताला एकांकिका स्पर्धेत एकापेक्षा जास्त एकांकिकेतून भूमिका करता येणार नाहीत.**

६. अंतिम स्पर्धेसाठी निवडून येण्यासाठी महाविद्यालयाला प्राथमिक फेरीत कमीत कमी ६० इतके गुण मिळणे आवश्यक आहे.

७. तालीम फेरीतून प्राथमिक फेरीसाठी आणि प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी निवड होण्यासाठी किमान ६० गुणांची आवश्यकता असेल.

८. स्पर्धेच्या पारितोषिका विषयी शासनाने घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

९. प्रवेशिकेतील नियम व अटींचे बरोबर अनुकरण न केल्यास, सदरचे महाविद्यालय पुढील एकांकिका स्पर्धेमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र. ३१६/सां.का.४, दि.२९ सप्टेंबर, २०२५ सोबतचे सहपत्र

**विवरणपत्र-१**

महाराष्ट्र राज्य एकांकिका स्पर्धा, प्राथमिक फेरी (०६ केंद्र) पारितोषिक

| अ.क्र. | पारितोषिकाचे नाव | पारितोषिक स्वरुप | पारितोषिक रक्कम |
|---|---|---|---|
| १. | उत्कृष्ट एकांकिका | प्रथम | ५०,०००/- |
| | | द्वितीय | ४०,०००/- |
| | | तृतीय | ३०,०००/- |
| | | चतुर्थ | २०,०००/- |
| | | पाचवे | १०,०००/- |
| २. | दिग्दर्शन | प्रथम | २०,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ३. | लेखन | प्रथम | २०,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ४. | प्रकाश योजना | प्रथम | १५,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ५. | नेपथ्य | प्रथम | १५,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ६. | रंगभूषा | प्रथम | १५,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ७. | संगीत दिग्दर्शन | प्रथम | १५,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ८. | वेशभुषा | प्रथम | १५,०००/- |
| | | द्वितीय | १०,०००/- |
| ९. | अभिनय रौप्यपदक | पुरुष-१ | १०,०००/- |
| | | स्त्री-१ | १०,०००/- |
| | | **एकुण रुपये** | **३,५५,०००/-** |
| | **प्राथमिक फेरी एकूण खर्च (रुपये ३,५५,०००/- x ६ केंद्र)** | | **२१,३०,०००/-** |

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र. ३१६/सां.का.४, दि. २९ सप्टेंबर, २०२५ सोबतचे सहपत्र

## विवरणपत्र-२

महाराष्ट्र राज्य एकांकिका स्पर्धा, अंतिम फेरी (०१ केंद्र) पारितोषिक

| अ.क्र. | पारितोषिकाचे नाव | पारितोषिक स्वरुप | पारितोषिक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | उत्कृष्ट एकांकिका | प्रथम | १,००,०००/- |
| | | द्वितीय | ७५,०००/- |
| | | तृतीय | ५०,०००/- |
| २ | दिग्दर्शन | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | ३०,०००/- |
| | | तृतीय | २०,०००/- |
| ३ | नाट्यलेखन | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | २०,०००/- |
| ४ | प्रकाश योजना | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | २०,०००/- |
| ५ | नेपथ्य रचना | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | २०,०००/- |
| ६ | रंगभूषा | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | २०,०००/- |
| ७ | संगीत दिग्दर्शन | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | २०,०००/- |
| ८ | वेशभुषा | प्रथम | ४०,०००/- |
| | | द्वितीय | २०,०००/- |
| ९ | अभिनय रौप्यपदक (५ पुरुष व ५ स्त्री) | १० पारितोषिके प्रत्येकी रुपये १०,०००/- | १,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम रुपये** | **७,७५,०००/-** |

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र. ३१६/सां.का.४, दि.२९ सप्टेंबर, २०२५ सोबतचे सहपत्र

## महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा

## प्रवेशिका

| | | |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नाव | |
| २ | महाविद्यालयाचा कायमचा पत्ता | |
| ३ | महाविद्यालयाचा दूरध्वनी अथवा भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :<br>संघप्रमुखाचा भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक : | |
| ४ | ई-मेल आयडी | |
| ५ | रु. २,०००/- (रुपये दोन हजार) इतकी रक्कम ऑनलाईन भरणा केली आहे काय ? | होय/नाही |
| ६ | महाविद्यालय महाराष्ट्रातील कोणत्या विद्यापीठास संलग्न आहे का ? | होय/नाही |
| ७ | संलग्न असल्यास विद्यापीठाचे नाव नमुद करावे | |
| ८ | मराठी एकांकिका स्पर्धेत सादर करावयाच्या एकांकिकेचे नाव | |
| | लेखकाचे नाव | |
| | दिग्दर्शकाचे नाव | |
| ९ | एकांकिका स्पर्धेसाठी सूचविण्यात आलेल्या एकांकिकेच्या लेखकाचे परवानगीपत्र सोबत जोडले आहे काय ? | होय/नाही |
| १० | एकांकिकेचे स्वरुप स्वतंत्र आहे किंवा कसे ? | स्वतंत्र<br>भाषांतरित<br>रुपांतरित<br>आधारित |
| ११ | सोबत संहिता जोडली आहे काय ? नवीन संहिता असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. (संहितेच्या दर्शनी भागात महाविद्यालयाचे, एकांकिकेचे नांव तसेच लेखकाचे नाव नमूद करावे) | होय/नाही |
| १४ | या एकांकिकेचे या वर्षीच्या स्पर्धेपूर्वी दहापेक्षा अधिक प्रयोग झालेले नाहीत, हे खरे आहे काय ? ( एकांकिका / दीर्घांक स्वरुपात) | होय/नाही |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | वरील प्रयोग झाले असल्यास सोबतच्या नमुन्यातील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे माहिती वेगळया कागदावर देण्यात यावी . | नाटकाचे नाव | वर्ष | पारितोषिकाचा क्रमांक | पारितोषिक रक्कम |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| १६ | रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक (सोबत प्रमाणपत्र जोडावे) | प्रमाणपत्र क्र:<br>दिनांक: | | | |
| १७ | एकांकिकेतील सहभागी कलाकारांची भ्रमणध्वनीसह यादी जोडली आहे का ? (कलाकार, तंज्ञत्र, दिग्दर्शक व इतर) | होय/नाही | | | |
| १८ | विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे का? | होय/नाही | | | |

टीप:- ऑनलाईन प्रवेशिका वेळेत पूर्णपणे भराव्यात. प्रवेशिकेतील त्रुटी कळविल्या जाणार नाहीत. तसेच प्रवेशिका सादर करण्याची तारीख वाढवून अथवा बदलून दिली जाणार नाही.

स्थळ:
दिनांक:

प्राचार्य स्वाक्षरी
महाविद्यालयाचे नाव

(रबरी शिक्यासह)

# प्रतिज्ञापत्र

प्रति,

संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

(१) आम्ही प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, प्रवेशिकेत भरण्यात आलेली माहिती सत्य व बरोबर आहे.

(२) आम्ही सादर करीत असलेल्या एकांकिकेतील सर्व कलावंत प्रवेशिकेत नमूद केल्यानुसार आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी आहेत.

(३) आम्ही मराठी एकांकिका स्पर्धेच्या सर्व अटी व नियम वाचले असून त्या सर्वांचे आम्ही पालन करीत आहोत.

(४) एकाकिका स्पर्धेचे नियम आम्हाला बंधनकारक आहेत.

(५) एकांकिका स्पर्धेसाठी आमच्या एकांकिकेची निवड झाल्यास दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या तारखेस व वेळेस एकांकिकेचा प्रयोग सादर करु.

(६) काही अपरिहार्य कारणास्तव एकांकिका स्पर्धा पुढे ढकलण्यात आल्यास किंवा रद्द झाल्यास महाविद्यालयाचा झालेल्या कोणत्याही खर्चास शासन जबाबदार राहणार नाही.

(७) महाविद्यालयाने ऐनवेळी एकांकिकेचा प्रयोग रद्द केल्यास प्रवेशिकेसोबत भरलेली रुपये २,०००/- ची अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल, ती रक्कम परत मिळणार नाही.

(८) परिक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम राहील, याची जाणीव ठेऊन याची जाणिव ठेऊन त्याबाबत आम्ही शासनाशी कोणताही पत्रव्यवहार किंवा चर्चा करणार नाही.

स्थळ : प्राचार्य स्वाक्षरी

दिनांक : महाविद्यालयाचे नाव
(रबरी शिक्क्यासह)

************

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## सांस्कृतिक कार्य विभाग

## सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

आयोजित



# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा

## प्रवेशिका दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन उपलब्ध

## वेबसाईट - www.mahanatyaspardha.com

: महत्वाचे नियम :

- महाराष्ट्रातील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.
- ही स्पर्धा तालीम, प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा तीन फेरीत आयोजित करण्यात येईल.
- तालीम फेरी डिसेंबर मध्ये तर प्राथमिक आणि अंतिम फेरी जानेवारी मध्ये घेण्यात येईल.
- प्राथमिक फेरी ६ महसुली विभागाच्या ठिकाणी आयोजित करण्यात येईल.
- अंतिम फेरी मुंबई येथे घेण्यात येईल.

**परितोषिकांचा तपशील**

| पारितोषिक क्रमांक | प्राथमिक फेरी (६ ठिकाणी) | अंतिम फेरी |
|---|---|---|
| प्रथम | रु. ५०,०००/- | रु. १,००,०००/- |
| द्वितीय | रु.४०,०००/- | रु. ७५,०००/- |
| तृतीय | रु. ३०,०००/- | रु. ५०,०००/- |
| चतुर्थ | रु. २०,०००/- | |
| पाचवे | रु. १०,०००/- | |

याशिवाय उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश, रंगभूषा, वेशभूषा, लेखन, संगीत यासाठी रोख रकमेची पारितोषिके

विनीत

**डॉ. किरण कुलकर्णी** (भा.प्र.से.)
सचिव,
सांस्कृतिक कार्य विभाग

**बिभीषण चवरे**
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

अधिक माहितीसाठी QR कोड स्कॅन करा.

संपर्क : 9664159343 / 8097731523